वर्ष-०८ | अंक-२२ | मुंबई, मंगळवार १९ ते २५ एप्रिल - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
अहमदनगर मध्ये हनुमान मंदिरामागे सुरु होता आयपीएलवर सट्टा


3 → जेम्स लेनच्या खुलाशानंतर पवारांविरोधात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीवर राऊत स्पष्ट बोलले; म्हणाले, "कायद्याचं राज्य..."

डोळ्यासमोरच पतीने आपल्याच पत्नीवर दोघांना करायला सांगितला बलात्कार, लातूर हादरलं ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## सामाजिक तेढ निर्माण करण्यांना बसणार चाप

### मुंबई पोलिसांची सोशल मीडिया लॅब सक्रिय



सध्या राज्यासह देशातीस परिस्थिती पाहता समाजकटंकाकडून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचं दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस सक्रिय झाले आहेत. मुंबईत जातीय वाद नियंत्रणात ठेवण्यासाठी सोशल मीडिया लॅब सक्रिय करण्यात आली आहे. यामुळए आता सोशल मीडियाचा वापर करत सामाजित तेढ निर्माण करण्यांना आता चाप बसणार आहे. मुंबई पोलिसांच्या सोशल मीडिया लॅबकडून आक्षेपार्ह पोस्टवर कारवाई करण्यात येतेत. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत जातीय तेढ निर्माण करु शकणाऱ्या सुमारे 3000 पोस्ट डिलीट केल्या आहेत. रामनवमीपासून महाराष्ट्रात काही ठिकाणी हिंसाचार उसळला होता. याप्रकरणी मुंबईत सहा गुन्हे दाखल झाले आहेत. पहिला गुन्हा मानखुर्द पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. तसेच दुसरा गुन्हा मालवणी पोलीस ठाण्यात, तिसरा गुन्हा कुरारा पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. तसेच गोरेगावच्या आरे कॉलनीत एकूण तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी पोलिसांकडून मानखुर्द घटनेत आतापर्यंत 30 जणांना अटक करण्यात आली आहे. कुरार प्रकरणी 6 जणांना अटक करण्यात आली आहे. गोरेगाव प्रकरणी 25 जणांना अटक करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांकडून सामाजिक तेढ निर्माण केल्या प्रकरणी आतापर्यंत 61 जणांना अटक करण्यात आली आहे.

# मुलीचे लग्न लावण्यास नकार देणाऱ्या पित्याची हत्या करणाऱ्या तिघांना पुण्यातून अटक

मुलीचे लग्न लावून देण्यास नकार देणाऱ्या वडिलांची हत्या करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली आहे. पुण्यातून आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.

केज येथील एका तरुणाने मुलीच्या वडिलांच्या डोक्यात लोखंडी रॉड घातला होता. उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ९ एप्रिल रोजी केज-कळंब मार्गावर साळेगाव शिवारात शेख फरीद बाबा दर्गाजवळ असलेल्या संत सेना महाराज यांच्या मंदिरा जवळ रमेश एकनाथ नेहरकर (वय ४२, रा. धारूर रोड) हे केज ते कळंब मार्गावरून मोटार सायकल वरून येत असताना आरोपीने त्यांच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी केले होते. रमेश नेहरकर यांच्यावर अश्विनी हॉस्पिटल लातूर येथे उपचार सुरू होते. मात्र, ११ एप्रिल रोजी रमेश नेहरकर मृत्यू झाला.

### प्रकरण काय?

केज तालुक्यातील तांबवा येथील भागवत चाटे याने रमेश नेहरकर यांच्या अल्पवयीन मुलीचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल केला होता. या कृत्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या रमेश नेहरकर यांना आरोपी भागवत साठे याने तुमच्या मुलीचे माझ्यासोबत लग्न लावून द्या, नाहीतर तुम्हाला जीव मारेल अशी धमकी दिली होती. या धमकीनंतर दुसऱ्या दिवशीच रमेश नेहरकर यांच्यावर केज कळंब रस्त्यावरील गांजी पाटीजवळ भागवत साठे व त्याच्या दोन साथीदारांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात रमेश नेहरकर हे गंभीर जखमी झाले. जखमी उमेश नेहरकर यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, गंभीर जखमी झालेल्या नेहरकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. नेहरकर यांच्या मृत्यूनंतर संतप्त नातेवाईकांनी रमेश नेहरकर याचे प्रेत केज पोलीस ठाण्यात आणून आरोपींना अटक करण्याची मागणी केली होती.

### पोलिसांची कारवाई


गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे पोलीस नाईक अनिल मंदे यांनी प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी




सहाय्यक सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मिसळे व त्यांचे पथक आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी रवाना झाले होते.

रमेश नेहरकर यांच्या हत्येनंतर कुटुंबीय आणि ग्रामस्थ संतप्त झाले होते जोपर्यंत आरोपींना अटक करणार नाही तोपर्यंत नेहरकर यांचा मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका सुद्धा कुटुंबीयांनी घेतली होती. मात्र त्यानंतर या घटनेत आरोपी हे झाशी येथे फरार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपींच्या मोबाईलचे टॉवर लोकेशनवरून आरोपी हे केज वरून पुणे मार्गे झाशी येथे गेले. ते तिघे पुन्हा उत्तर प्रदेश या मार्गे परत पुणे येथे येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करून त्याची खात्री होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मिसळे, त्यांच्या पथकातील अनिल मंदे व दिलीप गित्ते पुण्याला रवाना झाले. तिन्ही आरोपींना वाघोली येथून पोलिसांनी अटक केली.

## हालचालींना वेग; बिगर भाजपा मुख्यमंत्री मुंबईत येणार, राऊतांचे संकेत



मुंबई : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जीही भाजपाविरोधात विरोधकांची मोट बांधण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्यानंतर आता मुंबईमध्ये देशभरातील बिगर-भाजपा मुख्यमंत्र्यांना एकत्र आणले जाणार आहे, त्यासाठी राज्यात हालचाली सुरु झाल्या आहेत, असे संकेत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी दिले आहेत. हे शक्य न झाल्यास काँग्रेसचे युपीएतील महत्व कमी करून बिगर काँग्रेसी नेता युपीएचे नेतृत्व करेल, यासाठीही प्रयत्न करत आहेत. संजय राऊत यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी लवकरच मुंबईत बिगर भाजप मुख्यमंत्र्यांची परिषद होणार आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपची सत्ता नसलेल्या सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा करण्याची गरज या पत्रात अधोरेखित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यात याबाबत चर्चा झाली असून मुंबईत असे संमेलन आयोजित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बेरोजगारी, महागाई, केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर, जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न यासह विविध मुद्द्यांवर आगामी बैठकीत चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला कोटयावधीचा गुटखा धुळे स्थानिक गुन्हे शाखेकडुन जप्त.






धुळे : परराज्यातुन महाराष्ट्रात गुटख्याची तस्करी करणाऱ्या ५आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यात असलेला कोट्यावधीचा गुटखा स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांनी जप्त केला आहे. परराज्यातुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पानमसाल्याची विक्री करण्याच्या उद्येशाने तस्करी होत असल्याने मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रविणकुमार पाटील, धुळे यांनी पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बुधवंत, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना सुचना देऊन कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

सदर आदेश नुसार दिनांक १७/०४/२०२२ रोजी पो.निरी.श्री. शिवाजी बधवंत, स्थागुशा धुळे यांना गुप्तबातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, ४ कंटेनरमधून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा भरुन मुंबई शहरात विक्री करण्याचे उददेशाने वाहतुक करुन सदर कंटेनर दिल्ली येथुन निघुन धुळे जिल्हयातील हेंद्रुण-मोघण, मालेगाव मार्गे मुंबई येथे जात असल्याबाबत माहिती मिळाली त्यानुसार पोलीस पथकाने लागलीच सदर कंटेनरचा शोध घेवुन पुरमेपाडा गावाजवळ नमुद चारही कंटेनर एका मागे एक जात असल्याचे दिसल्याने पथकाने कंटेनर थांबवले व वाहन चालक १) साबिर मजिद खान रा. हरीयाणा २) शकील अहमद लियाकत अली रा. जिल्हा नुहू ३) रुकमोद्यीन अयुब खान रा. जिल्हा नुहू ४) मुरसलिम रुजदार रा. जिल्हा भरतपुर ५) नसिम खान अली मोहम्मद खान रा. जिल्हा पलवल यांना ताब्यात घेऊन कंटेनर मधील माला बाबत विचारपुस करता त्यांनी पोलिसांना डवा-उडवीचे उत्तरे दिल्याने त्यांना कंटेनरसह मोहाडी नगर पोलीस ठाणेच्या आवारात आणून कंटेनरची तपासणी केली असता त्यामध्ये १) १,३०,४९,२८०/- रु.किं.ची 4K स्टार व SHK सुंगधीत पानमसाला तंबाखु २) ६०,००,०००/- रु.कि.चे एकुण ०४ कंटेनर ३) २५,०००/- रु.किं.चे वेगवेगळया कंपनीचे एकुण ०५ मोबाईल फोनअसा एकुण १,९०,७४,२८०/- रु.किंमतीचा माल हस्तगत केला असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस अधीक्षक, धुळे, श्री. प्रशांत बच्छाव, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा.चे पो.निरी.श्री.शिवाजी बुधवंत, सपोनि प्रकाश पाटील, पोसई बाळासाहेब सुर्यवंशी, पोहेकॉ/रफिक पठाण, पोना/गौतम सपकाळे, पोना/राहुल सानप, प्रकाश सोनार, संदीप सरग, कैलास महाजन, संजय सुरसे अशांनी केली आहे.


## एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकार देणार आणखी एक धक्का : संपकाळातील वेनत नाही

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबाजणी करुन एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांना आणखी एक धक्का देणार आहे. 'काम नाही, तर वेतन नाही' या न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी महामंडळ करणार आहे. त्यामुळे संपकाळात कामावर गैरहजर राहिलेल्या एसटी कर्मचाऱ्यांना वेतन न देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. रजेशिवाय किंवा कोणतेही कारण न देता गैरहजर असलेल्या कालावधीसाठी वेतनावर दावा करण्याचे निर्देश कोणालाही देता येणार नाही. त्यामुळे 'नो वर्क, नो पे' या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी महामंडळातही केली जाणार आहे. राज्य शासनात विलीनीकरण करण्याच्या मागणीसाठी तीन नोव्हेंबरपासून राज्यभरात सुरू झालेल्या संपात राज्यातील सुमारे ९२ हजार कर्मचारी सहभागी झाले होते.



सुरुवातीचे अडीच महिने सर्वच एसटी कर्मचारी संपात सहभागी होते. त्यानंतर मात्र टप्प्याटप्प्याने कर्मचारी कर्तव्यावर हजर होऊ लागले. न्यायालयाच्या निकालापर्यंत पाच महिन्यांपर्यंत ४० ते ४५ हजार कर्मचारी संपात सहभागी होते. त्यामुळे संपकाळात कामावर न आलेल्या या कर्मचाऱ्यांना पगारापासून वंचित राहावे लागणार आहे. एसटीच्या विलीनीकरणाच्या मागणीसाठी हा संप पुकारण्यात आला होता. मात्र, पाच महिने संप पुकारूनही धोरणात्मक आणि न्यायालयीन लढा संपकरी जिंकू शकले नाही.

कामगार न्यायालयाने एसटी कर्मचाऱ्यांचा संप बेकायदा ठरवला होता. कामावर गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन देता येणार नसल्याचेही सांगितले. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाची महामंडळाकडून अंमलबजावणी केली जाणार आहे. असे एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी सांगितले. विलीनीकरणाच्या नावाखाली पाच महिने झालेल्या संपातून एसटी कर्मचाऱ्यांचा फायदा होण्याऐवजी आर्थिक नुकसानच झाले आहे. योग्यवेळी चर्चेतून तोडगा न काढल्याने कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित राहावे लागणार आहे, असे महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेसचे (इंटक). सरचिटणीस मुकेश तिगोटे यांनी सांगितले.



# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार १९ ते २५ एप्रिल - २०२२


# अहमदनगरमध्ये हनुमान मंदिरामागे सुरू होता आयपीएलवर सट्टा

## पोलिसांनी छापा टाकून एकाला केली अटक.



अहमदनगर: नगर शहरातील सावेडी उपनगरात सूर्यनगर येथील हनुमान मंदिरामागील मोकळ्या मैदानात आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील सामन्यावर सट्टा लावला जात होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना याची माहिती मिळाली. पोलिसांनी छापा टाकून एकाला अटक केली आहे. ज्याच्या सांगण्यावरून हा जुगार सुरू होता, त्याचा शोध सुरू आहे. सध्या सुरू असलेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर सट्टा लावण्याचे प्रकार वाढले आहेत. प्रत्यक्ष येऊ न शकणाऱ्यांसाठी आणि पोलिसांची नजर चुकविण्यासाठी मोबाईलवरून बुकिंग घेतले जात आहे. त्यामुळे पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेला अशा घटनांवर लक्ष ठेवून कारवाई करण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल कटके यांना नगर शहरात सुरू असलेल्या या प्रकाराची माहिती मिळाली. सावेडी उपनगरात सूर्यनगर परिसरात हनुमानाचे मंदिर आहे. त्यामागील मोकळ्या मैदानात हा जुगार खेळला जात असल्याची माहिती कटके यांना मिळाली. त्यांनी पोलिस पथकाला तेथे जाऊन कारवाई करण्यास सांगितले. पोलिसांनी तेथून चेतन पांडुरंग वराडे (वय ४१, रा. सुर्यनगर, अहमदनगर) याला ताब्यात घेतले. तो प्रवीण गिते (रा. पाईपलाईन रोड, अहमदनगर) याच्या सांगण्यावरून हे बुकिंग घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. कोलकाता नाईट रायडर्स विरुध्द सन रायझर्स हैद्राबाद या सामन्यावर ते सट्टा लावत होते. वराडे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडील मुद्देमाल जप्त करण्यात आला. आता गिते याचा पोलिस शोध घेत आहेत. पोलिस अंमलदार संदिप पवार यांचे फिर्यादीवरुन आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेतील सोपान गोरे, अण्णा पवार, पोना शंकर चौधरी, पोना सचिन आडबल, लक्ष्मण खोकले यांच्या पथकाने ही कारवाई केली. आरोपीला तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# मुंबई लोकलमधील धक्कादायक प्रकार; मोबाइल चोराचा प्रतिकार करत असतानाच ती...

***मोबाइल चोराचा प्रतिकार करत असताना महिला प्रवासी धावत्या लोकलमधून खाली कोसळल्यानंतर धक्कादायक घटना मुंबईत घडली आहे. तिची प्रकृती सध्या चिंताजनक आहे.***



- मुंबई लोकलमधील धक्कादायक प्रकार उघड.
- महिला प्रवासी लोकलमधून खाली कोसळली.
- चोरट्याचा प्रतिकार करत असताना घडली घटना.

मुंबई: मुंबई लोकलमधील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोबाइल चोराचा प्रतिकार करत असताना एक महिला प्रवासी धावत्या लोकलमधून खाली पडली असून यात सदर महिला गंभीररित्या जखमी झाली आहे. सायन रुग्णालय येथे या महिलेवर उपचार सुरू असून सध्या तिची मृत्यूशी झुंज सुरू आहे. दरम्यान, या घटनेने मुंबई उपनगरीय लोकलमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पश्चिम रेल्वे मार्गावरील माहीम रेल्वे स्टेशन येथे याच आठवड्यात ही घटना घडल्याची माहिती आता रेल्वे पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेत प्रियांका खडके (४९) या गंभीररित्या जखमी झाल्या आहेत. त्यांना सायन रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असून अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती अजूनही चिंताजनक आहे, असे सांगण्यात आले. प्रियांका खडके या बदलापूर येथे राहणाऱ्या असून सांताक्रूझ येथील रेशन ऑफिसमध्ये क्लर्क आहेत. माहीम स्टेशन येथील प्लॅटफॉर्म क्र. २ जवळ त्या लोकलमधून खाली कोसळल्या. चोरट्याने त्यांच्या हातातील मोबाइल खेचला व लोकलमधून उडी मारली. त्याचा प्रतिकार करत असतानाच प्रियांका यासुद्धा खाली कोसळून जखमी झाल्या. यावेळी अन्य प्रवाशांनी आरडाओरडा केला असता स्टेशनवरील प्रवाशांनी मोठे धाडस दाखवत पाठलाग करून चोरट्याला पकडले व पोलिसांच्या हवाली केले. आरोपीची ओळख पटली असून रमजान उर्फ यसीनुद्दीन खान (२८) असे त्याचे नाव आहे. आरोपीकडून प्रियांका यांचा १५ हजार रुपये किमतीचा मोबाइल हस्तगत करण्यात आला आहे. त्याच्याविरुद्ध मुंबई सेंट्रल जीआरपी स्टेशन येथे कलम ३९४ आणि ३३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, यसीनुद्दीन हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्याचे स्पष्ट झाले असून याआधीही त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

# पैशांवरुन पत्नी सतत भांडायची; रागाच्या भरात CA असलेल्या पतीने मुलालाही सोडलं नाही, भयंकर घटना



नवी दिल्ली, गीता कॉलनीमध्ये शनिवारी दुपारी एका व्यक्तीने आपली पत्नी आणि मुलाची गळा दाबून हत्या केली. मृतांमध्ये कंचन अरोडा (38) आणि मुलगा ध्रुव (15) यांचा समावेश आहे. पोलिसांनी सायंकाळी उशिरा आरोपी पती सचिन (40) याला अटक केलं. आरोपीने दिलेल्या माहितीनुसार, लॉकडाऊनमध्ये नोकरी गेल्यानंतर तो वडिलांसोबत किराण्याच्या दुकानात बसत होता. पैशांवरुन पत्नीसोबत वारंवार भांडण (Crime News) होत होतं. यातून त्याने हा धक्कादायक प्रकार केला. सचिन अरोडा शनिवारी दुपारी साधारण 2 वाजता दुकानातून घरी आला. तो दुसऱ्या माळ्यावर गेला. साधारण 20 मिनिटांनंतर तो खाली आला. आणि म्हणाला की, मी त्यांचं काम पूर्ण केलं आहे आणि आता स्वत:चं काम करायला जातोय. वडील ओम प्रकार हे ऐकून अवाक् झाले. आणि सचिनचा हात पकडण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र हात सोडून तो दूर पळाला. वडील दुसऱ्या मजल्यावर गेले तर सून कंचन आणि नातू ध्रुव मृत अवस्थेत होता. हे दृश्य पाहून वडिलांना धक्काच बसला. सचिनने फॅमिलीच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर एक मेसेज 3 वाजून 18 मिनिटांनी पाठवला. माझ्या कुटुंबातील सर्वांनी खूश राहावं आणि एन्जॉय करावं. गुड बाय...सर्वांसाठी माझे शेवटचे शब्द...दुसरा मेसेज 3 वाजून 48 मिनिटांनी पाठवला. हे सर्व मी माझ्या मर्जीने केलं आहे. माझं डोकं ठिकाण्यावर नाही. सर्वांना माझा नमस्कार..यामुळे कुटुंबातील सर्वजण घाबरले. आणि त्यांनी फोन करायला सुरुवात केली. यानंतर त्यांना कळालं की, सचिनने पत्नी आणि मुलाची हत्या केली आहे.

# धक्कादायक! खिचडीत मीठ जास्त झाल्याने पतीकडून पत्नीची हत्या




भाईंदर : सासऱ्याला वेळेत चहा, नाश्ता न दिल्याच्या रागातून गोळी झाडून सुनेची हत्या केल्याची घटना ताजी असतानाच आज मुंबई जवळच्या भाईंदर येथे अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. खिचडीत मीठ जास्त झाल्याच्या रागातून पतीने पत्नीची हत्या केली आहे. निलेश घाग असे हत्या करणाऱ्या संशयित पतीचे नाव आहे. भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत निलेश आपल्या कुटुंबासोबत राहतो. त्याच्या पत्नीने शुक्रवारी सकाळी नाश्त्यामध्ये साबुदाणा खिचडी बनवली होती. ही खिचडी खारट झाली होती. त्यामुळे रागाच्या भरात निलेश याने पत्नीची कापडी पट्ट्याने गळा आवळून हत्या केली. हा धक्कादायक प्रकार शनिवारी उघडकीस आला. या प्रकरणी निलेश घाग याला पोलिसांनी अटक केली आहे.या घटनेची माहिती मिळताच नवघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घडलेल्या घटनेचा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी भाईंदर पश्चिमेच्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात पाठवला. दरम्यान, खिचडीमध्ये मीठ जास्त झाल्यामुळेच हत्या केली की, हत्या करण्यास आणखी काही वेगळे कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. नवघर पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेच्या पथकाचे पोलीस निरीक्षक प्रकाश मसाल यांनी याबाबत माहिती दिली.

# नात्याला काळीमा..! सख्ख्या मामानंच अल्पवयीन भाचीला दिल्या नरकयातना, नराधम फरार



बीड, परळीतून अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. धारावती तांडा परिसरात वीटभट्टीवर काम करणाऱ्या आई सोबत राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची खळबळजनक घटना नुकतीच घडली आहे. नात्यातील निर्दयी सख्या मामानंच हे दुष्कृत्य केल्यानं एकच खळबळ उडाली आहे. अत्याचारास विरोध करणाऱ्या पीडितेच्या आईला देखील मामाने मारहाण केल्याची माहिती समोर येतेय. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. तर नराधम मामा सध्या फरार आहे. परभणी जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या मात्र कामानिमित्त परळी तालुक्यातील धारावती तांडा परिसरात आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ही महिला आपल्या भावाकडे राहते. या महिलेला पतीनं सोडून दिलं आहे. ही महिला वीटभट्टीवर मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. या महिलेच्या अल्पवयीन मुलीवर नात्यातील सख्या निर्दयी मामानेच असह्य परिस्थितीचा गैरफायदा घेत गलिच्छ दुष्कृत्य केल्याची संतापजनक घटना घडली आहे.नराधम मामा केवळ अल्पवयीन भाचीवर अत्याचार करून थांबला नाही तर तो अत्याचारास विरोध करणाऱ्या आपल्या बहिणीला ही मारहाण करत होता. या प्रकरणी परळी ग्रामीण ठाण्यात गुरनं ९९/२०२२ कलम ३७६, ३७६(२)(फ), ३७६ (२) (जे), ३७६ (२) (एन), ३२३, ३२४, ५०४, ५०६ भादवी, कलम ३, ४,१२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# 47 वर्षीय व्यक्तीचे 19 वर्षांच्या तरुणासोबत लैंगिक संबंध, VIDEO रेकॉर्ड करून मागितले पैसे, पण घडलं भयंकर!



**आनंद आणि श्रीराम यांच्यात समलैंगिक संबंध सुरू असल्याचे त्याने पाहिले. या संबंधाचे त्यांनी मोबाइलद्वारे चित्रीकरण केले**

बुलडाणा, : एखाद्या सिनेमाला लाजवेल अशी घटना बुलडाणा जिल्ह्यात घडली आहे. एका 19 वर्षीय तरुणासोबत समलैंगिक संबंध ठेवले आणि त्याचे चित्रिकरण केले. त्यानंतर खंडणी मागितली पण पैसे दिले नाही म्हणून एका 47 वर्षीय कक्षसेवकाचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार बुलडाणा शहर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. खून करणाऱ्या ७ आरोपी विरुद्ध बुलडाणा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीराम पांडुरंग शेळके (४७, मुळ रा. कासोदा, ता.सिल्लोड, ह.मु धामणगाव बढे) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. काही दिवसांपासून श्रीराम शेळके बेशुद्धअवस्थेत मलकापूर रोडवरील बालाजी मंदिराच्या कमानीजवळ एका मोकळ्या शेतात आढळून आले होते. पोलिसांनी त्यांना जखमी अवस्थेत उपचाराकरिता आधी बुलडाणा व त्यानंतर औरंगाबाद येथे हलवले होते. औरंगाबाद येथे उपचारादरम्यान श्रीराम शेळके याचा मृत्यू झाला. याप्रकरणी बुलडाणा शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केल्यानंतर तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जयसिंग पाटील यांच्याकडे देण्यात आला होता. पोलिसांनी तपासादरम्यान मृतक श्रीराम शेळके यांच्या कुटुंबीयांची व तो काम करत असलेल्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांची चौकशी केली. त्यावेळी गेल्या तीन महिन्यांपासून श्रीराम शेळके याला सतत कुणाचा तरी फोन यायचा तो त्यावर सतत बोलायचा आणि त्यानंतर अस्वस्थ व्हायचा असे पोलिसांसमोर आले. दरम्यान पोलिसांनी सायबर पोलिसांची मदत घेत महत्वपूर्ण माहिती गोळा केली.

त्यानंतर ह्या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. मृतक श्रीराम शेळके हा जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे कक्षसेवक पदावर कार्यरत होते. बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालय जवळील शहरातील सावित्रीबाई फुले नगरात राहणाऱ्या आनंद गवई (१९) याच्याशी काही महिन्यांपूर्वी त्याची फेसबुकवरून ओळख झाली होती. दोघांमध्ये फेसबुकवर चॅटिंग होत होती. त्यानंतर दोघांनी एकमेकांचे मोबाईल नंबर घेतले. मोबाईलवर आनंद आणि श्रीराम यांचे सातत्याने बोलणे व्हायचे. दोघांमध्ये व्हॉट्स ॲपवरून समलैंगिक संदेश , फोटो व व्हिडिओची देवाणघेवाण होत होती. त्यामुळे त्यांच्यात बरीच जवळीक निर्माण झाली होती.आनंद श्रीरामने बुलडाण्याला भेटायला बोलावले होते. खामगाव रोडवरील कोठारी शोरुमजवळ दोघांची भेट झाली. त्यादिवशी आनंदचा मित्र शाश्वत खंदायता यांच्या घरी कुणी नसल्याने घराची चाबी आनंदने घेतली होती. त्यानंतर दोघेही शाश्वतच्या घरी गेले. आनंदचा मित्र आदेश राठोड याला ही बाब माहीत झाल्याने त्याने हा प्रकार शाश्वतला सांगितला. आदेश आणि शाश्वतने घराच्या मागच्या दरवाजाने गुपचूप प्रवेश केला. त्यावेळी आनंद आणि श्रीराम यांच्यात समलैंगिक संबंध सुरू असल्याचे त्याने पाहिले. या संबंधाचे त्यांनी मोबाइलद्वारे चित्रीकरण केले आणि त्यानंतर लगेच खोलीत शिरून तो व्हिडीओ श्रीराम शेळके याला दाखवला आणि व्हिडिओ व्हायरल करायचा नसेल तर पैशांची मागणी केली.

श्रीरामने पैसे द्यायला नकार दिल्याने आदेश आणि शाश्वतने त्यांचे मित्र चेतन वावरे संतोष शर्मा, दीक्षांत नवघरे, कुंदन बेंडवाल यांना तिथे बोलावले. सगळ्यांनी मिळून श्रीरामला बेदम मारहाण केल्याने रक्तस्राव होऊन तो बेशुद्ध पडला. त्याच्या अंगातील रक्ताने माखलेला शर्ट काढून शाश्वतच्या घरातील दुसरा शर्ट त्याच्या अंगात चढवला. त्यानंतर बेशुद्धावस्थेतील श्रीरामला शाश्वतच्या चारचाकी वाहनात टाकून मलकापूर रोडवरील बालाजी मंदिराच्या कमानीजवळ असलेल्या मोकळ्या शेतात टाकून दिले. तिथेच श्रीरामची मोटर सायलकल सुद्धा आरोपींनी उभी करून दिली आणि श्रीरामच्या अंगातील रक्ताने माखलेला शर्ट जाळून टाकला. फिरायला गेलेल्या नागरिकांनी ही माहिती पोलिसांना दिली.

त्यानंतर पोलिसांनी जखमी श्रीरामला आधी बुलडाणा व त्यानंतर औरंगाबाद उपचारा करीता रेफर केले होते. दरम्यान दुसऱ्या दिवशी आरोपींनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता तिथे मोटरसायकल आणि श्रीराम दिसला नाही. त्यामुळे तो शुद्धीत येऊन घरी निघून गेला असावा असे आरोपींना वाटले त्यामुळे ते गाफील राहिले.

मात्र औरंगाबाद येथे उपचारा दरम्यान श्रीरामचा मृत्यू झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक जयसिंग पाटील यांनी हा तपास हाती घेतला. श्रीरामच्या कुटुंबीयांचा, त्याच्या सहकाऱ्यांचे जबाब नोंदविल्यानंतर हा घातपात असल्याच्या निष्कर्षापर्यंत पोलीस पोहचले. तांत्रिक तपासानंतर पोलिसांनी आधी संशयित म्हणून आनंद गवईला ताब्यात घेतले.त्याच्या चौकशीनंतर त्याने सर्व घटनाक्रम पोलिसांना सांगितला. त्यानंतर गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश लोधी व त्यांच्या पथकाने उर्वरित ६ आरोपींना एकाच वेळी शहरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. सर्व आरोपींची चौकशी केल्यानंतर त्यांनी गुन्हा कबूल केला. आज याप्रकरणी आनंद गवई, शाश्वत खंदायता, आदेश राठोड, चेतन वावरे, संतोष शर्मा, दीक्षांत नवघरे, कुंदन बेंडवाल यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.



## संपादकीय...

# अन्वयार्थ : वाढते तापमान-संकट

लांबलेल्या पावसाळ्यानंतर आणि थंडीची लाटही दीर्घकाळ राहिल्यानंतर आलेल्या उन्हाळ्याने संपूर्ण देश उष्म्याने अक्षरश: बेजार झाला आहे. एप्रिल महिन्याच्या पहिल्या पंधरवडय़ातच कमाल तापमानाने उच्चांक गाठायला सुरुवात केली. या महिन्यात क्वचित अनुभवाला येणारे ४० किंवा त्याहून जास्त अंश सेल्सिअसचे तापमान मुंबईसारख्या शहरानेही अनुभवले. यापुढील काळातही कमाल तापमान देशभरात सरासरीपेक्षा जास्त असेल, असे भाकीत हवामान खात्याने जाहीर केले आहे. दिल्लीत एप्रिलमध्येच ४२.४ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान वाढले. थंडी, ऊन आणि पाऊस या भारतातील तिन्ही ऋतूंचे वेळापत्रकही गेल्या काही दशकांत बदलत चालले आहे. त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर जेवढा होतो, तेवढाच शेतीवरही होतो आहे. संपूर्णत: निसर्गावर अवलंबून असलेली भारतीय शेती या वाढत्या तापमानामुळे अडचणीत येऊ लागली आहे. मागील पावसाळ्यात आलेल्या वादळांच्या गंभीर परिणामांपासून अजूनही पूर्णपणे सावरण्याच्या आतच तापमानवाढीमुळे कोकणातल्या आंब्यासमोर अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. पिकत आलेल्या आंब्याला या तापमानामुळे डागाळले जाण्याची भीती आहे. दुसरीकडे नागपूरच्या संत्र्यांनाही त्यामुळे करपण्याची, काळे पडण्याची समस्या भेडसावू लागली आहे. मिरची, टोमॅटो, वांग्यासह पालेभाज्यांची नवी रोपे उन्हामुळे करपत आहेत. त्यामुळे भाजीपाला उत्पादकांनाही या उन्हाचा त्रास होऊ लागला आहे. माणसावर तापमानवाढीचा होणारा परिणाम आरोग्याच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाचा होऊ शकतो. सतत उन्हात हिंडल्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी खालावली जाऊ शकते. सतत थंडपेये पिण्याची इच्छा वाढत राहिल्याने शरीरातील तापमानावर परिणाम होतो, त्याने गंभीर दुखणी उद्भवतात. हवामान खात्याने यंदा पाऊस चांगला पडण्याचे भाकीत केले आहे. त्याने दिलासा मिळाला असला, तरी सध्याच्या तापमानवाढीला सामोरे जाण्याची शक्ती त्या बातमीत नाही. पंजाब, हरियाणा, चंडीगड, राजस्थान आणि दिल्ली या प्रदेशांत येत्या आठवडय़ात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. आत्ताच देशातील अनेक राज्यांमध्ये वाढत्या उष्णतेमुळे होणाऱ्या वाढत्या वीजवापराचे संकट उभे ठाकले आहे. वाढत्या मागणीनुसार उच्चांक वापराएवढी वीज सतत निर्माण करीत राहणे, हे जसे आव्हान, तसेच वीजवाहक तारांवर तीव्र उष्णतेमुळे होणारे परिणाम टाळण्याचेही मोठेच संकट. अघोषित वीजकपात करण्याशिवाय अनेक राज्यांना तरणोपाय नाही, अशी आजची परिस्थिती आहे. शीतकटिबंधातील देश आणि बर्फाळ प्रदेशांमध्येही गेल्या काही वर्षांत उष्णतेच्या लाटा येत आहेत. त्यामुळे हिमनग, हिमनद्या वितळण्याच्या प्रमाणात वाढ होत असून परिणामी समुद्राच्या पाण्याची पातळी वाढते आहे. भारतातही दोनच आठवडय़ांपूर्वी जम्मू-काश्मीर आणि हिमालयाच्या क्षेत्रात उष्णतेची लाट आली होती. यंदाच्या उन्हाळ्यात पुढील काही दिवसांत पुन्हा या भागात उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता आहे. जगण्याच्या प्रत्येक क्षेत्रावर गंभीर परिणाम करणारे हे हवामान मानवी शरीराच्या सहनशक्तीची परीक्षा घेत आहे. अपुऱ्या विजेचा प्रश्न, पाण्याच्या असमान उपलब्धतेमुळे पिकांवर होणारे विपरीत परिणाम आणि शारीरिक अनारोग्याची चिंता असे हे तिहेरी संकट आहे. करोनाच्या विळख्यातून जरा कुठे बाहेर पडतो न पडतो, तोच वाढत्या तापमानाचे संकट उभे ठाकले आहे. त्याला सामोरे जाण्याचे आव्हान खूप आधीच लक्षात घ्यायला हवे होते. निसर्गावर अतिक्रमण करण्याच्या मानवी प्रवृत्तींमुळे हा धोका सहज टाळता येण्याजोगा निश्चितच नाही.



# मोजमाप गंड!

मोजणे- मापणे विरुद्ध अनमान-धपका यांत आपण भारतीयांस काय अधिक पसंत हे सांगण्याची गरज नाही, इतका हा (अव)गुण आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक बनला आहे. मुद्दा देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाचा, बेरोजगारीचा असो वा एखादा खाद्यपदार्थ बनवण्याचा. स्वच्छ, पारदर्शी, विज्ञानाधारित मोजमाप टाळण्याकडेच एकूण कल. म्हणून महत्त्वाच्या क्षेत्रांची आकडेवारीच आपणाकडे उपलब्ध नसते आणि खाद्यपदार्थातही आपले बल्लवाचार्य 'चिमूटभर मीठ' वा 'चवीपुरती साखर' घालण्याचे सल्ले सहज सर्रास देतात. म्हणजे मोजमाप नाही. जसे आपण तसे आपले सरकार. त्यामुळे त्याचाही कल आकडेवारी-आधारित भाष्यापेक्षा कुडमुडय़ा भाकितांवरच अधिक. हे आपले सांस्कृतिक वैगुण्य 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या ताज्या वृत्तलेखामुळे पुन्हा एकदा जागतिक पातळीवर चर्चेत आले आहे. विषय आहे करोनाच्या पहिल्या तीन लाटांत किती भारतीयांचे प्राण गेले, हा. सध्या या महासाथीच्या चौथ्या लाटेची टांगती तलवार डोक्यावर असताना हे प्रकरण उघडकीस आले असल्याने त्याची दखल घेणे आवश्यक ठरते.

जागतिक आरोग्य संघटनेतर्फे करोना साथीत जगात किती बळी गेले याची साद्यंत पाहणी सुरू असून त्याचा अहवाल प्रकाशित होणे अपेक्षित आहे. तथापि भारतामुळे या प्रयत्नांत मोठी आडकाठी येत असल्याचे वृत्त 'न्यूयॉर्क टाइम्स'ने दिले. विशेष म्हणजे ते भारत सरकारने नाकारलेले नाही. ही बाब फारच महत्त्वाची. कारण परदेशी वृत्तपत्रांनी प्रतिकूल वाटेल असे काहीही प्रसिद्ध केले की आपली प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया 'हा भारतविरोधी कट' अशी बालिश आणि न्यूनगंड निदर्शक असते. याबाबत तसे झालेले नाही. भारताच्या आरोग्य मंत्रालयाने आरोग्य संघटनेच्या पाहणीस आपला विरोध असल्याचे मान्य केले आहे. हा विरोध नोंदवण्यासाठी भारताने जागतिक आरोग्य संघटनेस पाच-सहा पत्रे पाठवली आणि तीत नक्की आक्षेप कशास आहे हे प्रकट केले. या जागतिक पाहणीनुसार जगभरात २०२१ च्या अखेरीपर्यंत जगभरात करोनाने दीड कोटी जनांनी इहलोकीची यात्रा संपवली. ही संख्या सर्व देशांनी जाहीर केलेल्या आपापल्या देशांतील मृतांच्या संख्येच्या दुपटीपेक्षा अधिक भरते. आतापर्यंतच्या तपशिलानुसार करोनामुळे जगात साठ लाख जण प्राणास मुकले, असे मानले जाते. पण जागतिक आरोग्य संघटना तर म्हणते ही संख्या आहे दीड कोटी. तसे असेल तर प्रत्येक देशातील बळींच्या संख्येतही त्यानुसार बदल होतो. त्यानुसार एकटय़ा भारतातूनच या साथीत ४० लाखांचे बळी गेले असे हा संभाव्य अहवाल सुचवतो.

आपल्याला अर्थातच हे मंजूर नाही. पण तसे थेट म्हणणे बरे दिसणार नाही, असे वाटल्यामुळे असेल बहुधा पण त्यामुळे आपण आक्षेप घेतला आहे तो पाहणी-पद्धतीस. जागतिक आरोग्य संघटनेची ही मृत-मापन पद्धत चुकीची आहे, असे आपले म्हणणे. ते नोंदवताना आपण 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या हेतूंबाबत संशय व्यक्त करण्यास विसरलेलो नाही, ही बाब सूचक. ज्या पद्धतीने आरोग्य संघटना मृत-मापन करू पाहते तीत एकवाक्यता आणि समानता नाही, हे आपले म्हणणे. त्यानुसार जगाची दोन गटांत विभागणी करण्यात आली असून या दोन गटांतील देशांतल्या बळींचे दोन पद्धतींनी मापन केले गेले. हे आपणास नाकबूल आहे. 'आपल्यासारख्या खंडप्राय देशासाठी असा निकष लावला जाणे अयोग्य आहे,' हा आपल्या आरोग्य खात्याचा युक्तिवाद. त्याच्या समर्थनार्थ आपले तर्काधारित मुद्दे काय हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. ते कदाचित होणारही नाही. कारण 'आम्ही इतरांसारखे नाही' अशी एकदा का भूमिका घेतली की इतरांस जे लागू होते ते आपणास कधीच स्पर्श करू शकत नाही. याच धारणेतून आपला या मोजमापनास आक्षेप दिसतो. पण महत्त्वाची बाब ही की असा आक्षेप घेणारे आपण एकटेच नाही. या आक्षेप मोहिमेत आपले साथीदार देश आहेत इराण, बांगलादेश, सीरिया, इथियोपिया, इजिप्त आणि चीन.


यावरून आपण कोणाच्या तरी पंगतीत आहोत हे कळेल. या कोणत्याही देशात करोना साथ आणि तिने घडवलेला उत्पात याविषयी पारदर्शकता नव्हती आणि नाहीही. यातील चीन या देशात सध्या चौथ्या वा पाचव्या लाटेचा धुमाकूळ सुरू आहे. शांघाय हे त्या देशाचे आर्थिकदृष्टय़ा अत्यंत महत्त्वाचे शहर अराजकाच्या उंबरठय़ावर आहे. त्या शहरातील नागरिक आणि सरकारी यंत्रणा यात करोना हाताळणीबाबत संघर्ष सुरू झाला असून सुरक्षारक्षकांस पाचारण करण्याची वेळ आली आहे. पण हा देश आपला करोना मृत-मापनास आक्षेप घेणाऱ्यांतील जोडीदार; यातच काय ते आले. बाकी इथियोपिया वा सीरिया या देशांविषयी बरे बोलावे असे काहीही नाही. अनैसर्गिक मृत्यू हे या देशांतील नागरिकांचे प्राक्तन. कधी करोना तर कधी यादवी इतकाच काय तो फरक. खरे तर त्यामुळे करोनाच्या बळींची संख्या मोजण्यास त्या देशांस इतका आक्षेप असण्याचे काहीच कारण नाही. कलेवरे मोजणे हा तेथे नैमित्तिक कार्यक्रम. इराण, बांगलादेश यांची स्थिती या देशांपेक्षा निश्चित बरी. विशेषत: बांगलादेशाची आर्थिक प्रगती तर वाखाणण्याजोगी. आपल्या ज्येष्ठ सहोदरास, म्हणजे पाकिस्तान, बांगलादेशाने मागे टाकले आहे. पण तरी करोना मृत-मापनास त्याचा विरोध.

याच्या जोडीला आपण. आपली पवित्र वगैरे गंगामैया करोनाकाळात शववाहिनी झाली, प्राणवायूअभावी अनेकांस तडफडत प्राण सोडावे लागले, भीषण टाळेबंदीमुळे कराव्या लागलेल्या स्थलांतरणात अनेकांनी प्राण गमावले. पण याची आकडेवारी आपल्याकडे नाही. आपल्या सजग सर्वोच्च न्यायालयाच्या नजरेसदेखील यातील काही पडले नाही. अशा परिस्थितीत न पाहिल्यामुळे जे दिसलेच नाही, ते मोजायचे कसे, हा गंभीर प्रश्न आपल्या सरकारांपुढे असणार. त्याचमुळे; प्राणवायूअभावी प्राण गमावलेल्यांची एकही नोंद आपल्या देशात अजूनही नसावी यात आश्चर्य ते काय? सर्वोच्च लोकप्रतिनिधीगृहांतही सरकारने दिलेले उत्तर हे असेच आहे. त्या वेळी पत्रकारितेच्या धर्मास जागणाऱ्या वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने, वृत्तवाहिन्यांची दृश्ये प्राणवायूसाठी व्याकूळ नागरिकांच्या जथ्यांनी भरून गेले होते. प्राणवायू पुरवणाऱ्या नळकांडय़ा घेण्यासाठी देशाची राजधानी दिल्ली आदी परिसरांत रांगाच्या रांगा लागल्या. परिस्थिती इतकी गंभीर की रुग्णालयेदेखील माना टाकू लागली. पण याची अधिकृत तपशीलवार आकडेवारी सरकारने सादर केल्याचे दाखले औषधालाही मिळण्याची पंचाईत. त्यात या सर्वास राजकीय उत्तर मतपेटीतून मिळाले असे मानणाऱ्यांची आपल्याकडे चलती! अशा परिस्थितीत जागतिक आरोग्य संघटनेचा हा अहवाल खरे तर या संदर्भातील महत्त्वाचा दस्तावेज ठरू शकेल. पण आपला त्यालाही आक्षेप. वास्तविक भारताने या संघटनेचे काही घोडे मारलेले नाही. त्यामुळे आपल्याविषयी या संघटनेस आकस असण्याचा, भारताची बदनामी करण्याचा वगैरे उद्देश असण्याचे काही कारण नाही. पण तरीही आपणास असे वाटत असेल तर ते वास्तवापेक्षा खरे तर आपल्या न्यूनगंडाचे निदर्शक ठरते. महासत्ता होऊ पाहणाऱ्या देशाने ही भीती सोडायला हवी. मोजमापास विरोध म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनास विरोध. तो जितका लवकर आपण सोडू तितकी अधिक प्रगतीची संधी. मोजमापाची सवय प्रत्येकास वास्तव समजून घेण्यास उपयोगी असते. म्हणून वास्तव बदलू पाहणाऱ्या प्रत्येकाने मोजमापाची सवय अंगीकारणे आवश्यक. ती अभावी आपल्या महानतेचे गोडवे मनातल्या मनात गाणे निर्थक ठरेल.



# "मशिदींवर भोंगे लावण्यासाठी कोणी परवानगी मागण्यास आलं तर..."; मुस्लीम समुदायाकडून मुंबईच्या पोलीस आयुक्तांना पत्र

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भोंग्यावरुन घेतलेल्या भूमिकेमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. राज ठाकरे यांनी पुण्यातून पुन्हा एकदा ३ मेपर्यंतच्या अल्टिमेटमचा पुनरुच्चार केला आहे. त्यानंतर राजकीय पडसाद उमटताना दिसत असतानाच आता मुस्लीम समजातील संस्थांनीही परवानगी मिळवण्यासाठी पोलिसांकडे पत्रव्यवहार सुरु केलाय. आज मुंबईच्या पोलीस आयुक्तांना ऑल इंडिया सुन्नी जमायतुउल उलमाकडून पत्र पाठवून भोंग्यांसाठी परवानग्या मागण्यात आल्या तर त्या देण्यात याव्यात अशी मागणी केलीय. ऑल इंडिया सुन्नी जमायतुउल उलमा यांचे अध्यक्ष सय्यद मोनुउद्दिन अश्रफ यांनी मुंबईचे पोलीस आयुक्त संजय पांडे यांना पत्र येऊन मशिदींवर भोंगे लावण्यासंदर्भात कोणी परवानगी मागण्यास आल्यास त्यांना परवानगी द्यावी अशी मागणी केलीय. भोंगा लावण्याच्या परवानग्या देण्याचा हक्क स्थानिक पोलिसांना द्यावा अशी मागणीही रजा अकदामीकडून करण्यात आलीय. मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व पोलीस स्थानकांना अशा सूचना देण्यात



याव्यात की मशिदींवर भोंगे लावण्यासंदर्भात परवानगी मागण्यास कोणी आल्यास त्यांना परवानगी देण्यात यावी. अजानला जास्तीत जास्त तीन मिनिटं लागतात. त्यात १५ शब्दच असतात. अजानला कोणाचा विरोध नाहीय. विषय केवळ भोंगे वापरण्याचा आहे. तर भोंगे वापरण हे कायद्याच्या अंतर्गत आणण्यासाठी पोलिसांनी सहकार्य करावं अशी मागणी करण्यात आल्याची माहिती रजा अकादमीचे सचिव सईद नूरी जनरल यांनी प्रसारमाध्यमांसाठी जारी केलेल्या व्हिडीओत दिलीय. गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनीही भोंग्यांच्या प्रश्नावरुन वातावरण तापल्याने या प्रकरणाची दखल घेतलीय. भोंग्यासंदर्भात एकत्रित धोरण ठरवा असे आदेश राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिले आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त यांनी हे धोरण ठरवावं असं दिलीप वळसे पाटील यांनी सांगितलं आहे. जातीय तेढ निर्माण केल्यास कठोर कारवाई करावी असेही आदेश त्यांनी दिले आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त एकत्रित बसून एक निर्णय घेणार घेतील, गाईडलाईन्स तयार करतील अशी माहिती गृहमंत्र्यांनी दिली. पुढे ते म्हणाले की, "एक दोन दिवसात राज्यासाठी एकत्रित असं धोरण ठरवलं जाईल. मुंबईसह राज्यासाठी नोटीफिकेशन काढलं जाईल आणि त्यातून नियमावली जाहीर करण्यात येईल."

"मी अनेकदा सांगितलं आहे की, जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये. जाणीवपूर्वक कोणाकडून प्रयत्न झाला तर आणि त्याच्यात तो दोषी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाईल मग ती संघटना असो, व्यक्ती असो किंवा आणखी कोणीही असो," असंही दिलीप वळसे पाटील यांनी सांगितलं.

# जेम्स लेनच्या खुलाशानंतर पवारांविरोधात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीवर राऊत स्पष्टच बोलले; म्हणाले, "कायद्याचं राज्य..."



राज्यामध्ये सध्या मनसे विरुद्ध महाविकास आघाडी असा संघर्ष सुरु असल्याचं चित्र दिसत आहे. राज ठाकरे आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरेंच्या लिखाणावरुनही मोठा वाद निर्माण झालाय. एकीकडे राज ठाकरेंनी पुरंदरेंमुळे घराघरात छत्रपती शिवाजी महाराज पोहचल्याचे सांगताना दुसरीकडे शरद पवारांनी मात्र पुरंदरेंनीच जेम्स लेनला वादग्रस्त पुस्तकासाठी माहिती दिल्याचा आरोप केलाय. आता यावरुन जेम्स लेनने एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीमध्ये पुरंदरेंसोबत आपलं बोलणं झालं नसल्याचा दावा केला आहे. यानंतर भाजपाकडून शरद पवारांवर कारवाईची मागणी होत असताना शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना यावर भाष्य केलं आहे.

राज ठाकरे नेमकं काय म्हणालेले?

"बाबासाहेब पुरंदरे सॉफ्ट टार्गेट आहेत. त्यांनी चुकीचा इतिहास सांगितला म्हणे. पण कोणत्या पानावर सांगितला ते तर सांगा. यांचे इतिहासकार कोण? तर कोकाटे. महाराजांवर आजपर्यंत रणजित देसाईंनी लिहिलं, संभाजी महाराजांवर बाबासाहेबांनी, मेहेंदळेंनी लिहिलं. प्रत्येकानं आपापल्या पद्धतीने शिवाजी महाराज लोकांपर्यंत आणले. पण बाबासाहेब पुरंदरेंमुळे घराघरात शिवाजी महाराज पोहोचले. पण आम्हाला इतिहास बघायचा नाही. आम्हाला ते पुस्तक कोणत्या जातीच्या माणसानं लिहिलंय, ते बघायचंय. आम्ही छत्रपतींचा इतिहास सांगणार नाही. आम्ही मराठेशाहीचा इतिहास सांगताना त्यात फोड करणार की पेशव्यांनी केलेली गोष्ट वगैरे. शरद पवार साहेब, काय चाललंय? तुमच्यासारख्या बुजुर्ग माणसानं या महाराष्ट्रातला जातीपातीचा भेद गाडून टाकला पाहिजे. तुम्ही यासाठी प्रयत्न केला पाहिजे. पण तुमच्या राजकीय स्वार्थासाठी या सगळ्या गोष्टी सुरु आहेत," असा आरोप राज ठाकरेंनी ठाण्यातील सभेमधील भाषणातून केला होता.

पवारांनी काय उत्तर दिलं?

"शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी इतिहास वेगळ्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला होता. शिवाजी महाराजांना जिजामातांनी घडविले. पण, त्यांना दादोजी कोंडदेव यांनी घडविले, असं पुरंदरे यांनी लिहून ठेवलं होतं. जेम्स लेनने शिवाजी महाराजांबद्दल जे गलिच्छ लिखाण केले त्याची माहिती बाबासाहेब पुरंदरे यांनी पुरविली होती, असा उल्लेख लेनच्या पुस्तकात आहे. त्यावर पुरंदरे यांनी कधी खुलासा केला नव्हता. यातूनच मी पुरंदरे यांच्यावर टीकाटिप्पणी केली होती व त्याबद्दल मला अभिमान आहे," असं शरद पवार यांनी म्हटलं होतं. यानंतर मनसेने २००३ साली बाबासाहेब पुरंदरे आणि देशातील इतर नामांकित इतिहासकारांनी लिहिलेलं एक पत्रच जाहीर करत शरद पवारांनी माफी मागावी अशी मागणी केली. जेम्स लेन यांनी १६ एप्रिलला इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत २००३ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या 'शिवाजी : हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' (Shivaji: Hindu King in Islamic India) या पुस्तकासाठी पुरंदरे माहितीचे स्त्रोत नव्हते असा खुलासा केला आहे. पुस्तकातील वादग्रस्त माहिती तुम्हाला कोणी पुरवली याबद्दल विचारण्यात आलं. "तुम्ही हा प्रश्न चुकीच्या पद्धतीने विचारत आहात. कोणीही मला माहिती पुरवली नाही. माझं पुस्तक कथा आणि लोक त्या कशा सांगतात; त्या कथा सांगणाऱ्या लोकांच्या मूल्यांबद्दल आपल्याला काय सांगू इच्छितात याबद्दल होतं. उदाहरणार्थ, काही लोक शिवाजी महाराजांचा संबंध रामदास गुरुंसोबत जोडतात तर काहीजण तुकाराम महाराजांसोबत. यापैकी कोणती माहिती योग्य आहे आणि एक गट 'अ' कथानकाला का पसंती देतो आणि दुसरा गट 'ब' ला का यात मला रस नाही," असं उत्तर जेम्स लेन यांनी दिलं. तुम्हाला मिळालेल्या माहितीचा आधार काय होता? असं विचारण्यात आलं त्यावरही जेम्स यांनी स्पष्टीकरण दिलं. "जो कोणी माझं पुस्तक नीट वाचेल त्याला मी कोणताही ऐतिहासिक दावा करत नसल्याचं लक्षात येईल. मी शिवाजी महाराजांचा अपमान केला अशी टीका करणाऱ्यांनी नीट वाचलेलं नाही. पुन्हा सांगतो की मी फक्त कथा सांगतो, ऐतिहासिक तथ्य नाही," असं जेम्स यांनी स्पष्ट केलं.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र



मुंबई, मंगळवार १९ ते २५ एप्रिल - २०२२

## अज्ञात व्यक्तीने केली ८ वर्षीय मुलाची हत्या; घरापासून अवघ्या १०० मीटरवर सापडला मृतदेह




पिंपरी-चिंचवडमध्ये आठ वर्षीय मुलाच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून खून करण्यात आला आहे. ही घटना रविवारी रात्री समोर आली. लक्ष्मण देवासी असं हत्या झालेल्या आठ वर्षीय मुलाचे नाव आहे. त्याचा मृतदेह घराच्या शंभर मीटर अंतरावर सापडला आहे. या प्रकरणी एका संशयिताला चिखली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण देवासी हा आठ वर्षीय मुलगा रविवारी दुपारपासून बेपत्ता झाला. त्याचा आई वडिलांनी शोध घेतला, पण तो सापडला नाही. अखेर चिखली पोलीस ठाणे गाठून रात्री सातच्या सुमारास तो बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. पोलीस आणि कुटुंबीय त्याचा शोध घेत होते. तेव्हा, त्याच्या घरापासून शंभर मीटर अंतरावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत लक्ष्मणचा मृतदेह आढळला. त्याचा अज्ञात व्यक्तीने सिमेंटचा गट्टू घालून खून केला असल्याची माहिती समोर आली आहे.

# डोळ्यासमोरच पतीने आपल्याच पत्नीवर दोघांना करायला सांगितला बलात्कार, लातूर हादरलं

लातूर, : पती आणि पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारी मन हेलावून टाकणारी घटना लातूरमध्ये घडली आहे. शेतमालक आणि त्याच्या भावाने शेतातील महिलेवर सामूहिक बलात्कार केला असून यात खुद्द नवऱ्याची साथ मिळाली असल्याचा धक्कादायक प्रकार लातूर (latur) जिल्ह्यातील औसा इथं समोर आला आहे. दुर्दैवाची बाब अत्याचारानंतर पीडितेचा तब्बल 10 ते 15 किलोमिटर चालत मध्यरात्री लातुरच्या दोन पोलीस ठाण्यात तक्रार करून देखील मदत मिळाली नाही. अखेर पोलीस अधिक्षकांच्या सुचनेनंतर पतीसह तिघांविरुद्ध औसा पोलिसांत बलात्कार आणि ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील रहिवासी असलेली एक 32 वर्षीय महिला पतीसह औसा तालुक्यातील सारोळा रोडवर असलेल्या एका पानमळ्यात



सालगडी म्हणून वास्तव्यास होते. काही दिवसांपूर्वी या पती-पत्नीमध्ये वाद झाल्यामुळे ही महिला लातुरातील आपल्या आईकडे वास्तव्यास होती. वाद निवळल्यानंतर पीडित महिलेच्या आईने 9 एप्रिल रोजी या महिलेस पतीकडे नेऊन सोडले. रात्री 9 वाजेच्या सुमारास पीडित महिलेच्या पतीने पानमळ्याचे मालक असलेले इल्लु शेख आणि मुसा शेख या दोघांना घरी आणले आणि त्यांना स्वतःच्या पत्नीवर अत्याचार करण्यास सांगितले. त्यानुसार पतीसमोरच या महिलेवर दोघांनी अत्याचार केला. घटनेनंतर पीडित महिला घटनास्थळावरुन मध्यरात्री बाभळगाव नाक्यावर असलेल्या ग्रामीण पोलीस ठाण्यात विवेकानंद चौक पोलीस ठाणे गाठले. परंतू, त्यांनी पोलीस अधिक्षकांकडे जाण्याचा सल्ला दिला. त्यामुळे सदर महिला आईला सोबत घेवून पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. स्वतःवरील अत्याचाराची कर्मकहाणी ऐकवल्यानंतर त्यांनी औसा पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर आरोपी पतीसह अन्य दोघांविरुद्ध औसा पोलिसांत भादंवि तसंच अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# जागतिक यकृत (लिव्हर) दिन- १९ एप्रिल

## कोरोना महामारीमध्ये वाढलेल्या वजनामुळे यकृताच्या विविध आजारात झाली वाढ

मुंबई -ठाणे- १९ एप्रिल हा जागतिक यकृत दिन म्हणून साजरा केला जातो, यकृत दिनाच्या निमित्ताने आपल्या शरीरातील यकृताचे महत्व समजविण्याचा नागरिकांना जगभरात प्रयत्न केला जातो. अनेक रोगांना दूर ठेवणाऱ्या यकृताच्या आजाराबद्दल अजूनही जागरूकता आलेली नाही. दूषित पाण्यातून अथवा मद्याच्या सेवनातून यकृताला होणारे व्याधी कायम असताना आता लठ्ठपणामुळे होणाऱ्या आजारांची त्यात भर पडली आहे. कोरोना महामारीमध्ये अनेक नागरिक लॉकडाउनमुळे घरात अडकून पडले होते. समतोल आहार व व्यायामाच्या अभावामुळे यकृताच्या आजारात वाढ झालेली दिसून येत आहे. याविषयी अधिक माहिती देताना मुलुंड येथील प्लॅटिनम हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट व यकृत तज्ज्ञ डॉ. विनय पवार म्हणाले ," यकृत हा आपल्या शरीरातील सर्वांत मोठा अवयव आहे. चयापचयाच्या सर्व क्रियांमध्ये यकृताच्या महत्वाचा वाटा असतो आणि त्यामुळेच



यकृताला शरीराची केमिकल फॅक्टरी असे संबोधले जाते आणि ५०० हून अधिक कार्य यकृत करत असते. शरीरातील विशेषत: आतड्यांमधून येणाऱ्या अशुद्धी यकृतात शुद्ध केल्या जातात तसेच शरीरातील प्रमुख प्रथिने तसेच रक्त गोठविण्यासाठी लागणारे घटक यकृतात बनविले जातात. शरीराच्या रोगप्रतिकार शक्तीचाही यकृत एक प्रमुख घटक आहे.आणि म्हणूनच यकृताला आजार झाल्यावर शरीरात अनेकविध गुंतागुंतीचा प्रादुर्भाव होतो आणि काही प्रसंगी शरीराचे अस्तित्वही धोक्यात येऊ शकते. चुकीच्या आहारामुळे तसेच बैठ्या जीवनशैलीमुळे शरीरामध्ये मेदाचे (चरबीचे) प्रमाण अधिक वाढते. यामुळे यकृत तसेच शरीराच्या इतर भागांमध्ये चरबी साठते. यालाच फॅटी लिव्हर असे म्हणतात. चरबीयुक्त यकृताच्या आजारामध्ये यकृतात अतिरिक्त चरबी साचण्यापासून (स्टिटॉसिस) ते यकृत सुजणे (स्टिटोहेपटायटिस) या आजारापर्यंत विविध आजारांचा समावेश होतो. स्टिटो हेपटायटिस पूर्णपणे बरा होऊ शकतो. पण, वेळेवर उपचार केले नाहीत तर यकृताला सूज येऊन त्याला भेगा पडू शकतात किंवा यकृतातील ऊती कडक होऊ शकतात आणि त्याचं रूपांतर सिऱ्हॉसिसमध्ये होतं. काही रुग्णांना यामुळे यकृताचा कर्करोग होऊ शकतो".

हेपेटायटिस म्हणजेच कावीळ हा आजार आजही भारतात चिंतेचा विषय आहे. सर्वात जास्त मृत्यू होण्यामध्ये कावीळ या आजाराचा तिसरा क्रमांक लागतो. यकृत व कावीळ याचा संबंध सांगताना तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरचे हिपॅटोलॉजिस्ट - यकृतविशेषतज्ञ डॉ. कुणाल अध्यारु म्हणाले, " यकृत खराब झाले कि कावीळ होते परंतु कावीळ बाबत भारतामध्ये बरेच गैरसमज आहेत. जसे की, माळ बांधणे आणि कावीळ उतरणे या गैरसमजुतींचा या रोगाशी काहीही संबंध नाही. या अंधश्रद्धेमुळे वैद्यकीय उपचारांना विलंब झाल्याने भारतामध्ये विशेषतः अगदी शहरी भागात सुद्धा अनेक नागरिक मृत्युमुखी पडतात. जगभरात दरवर्षी १५ लाख लोकांचा म्हणजेच दर मिनिटाला एका व्यक्तीचा मृत्यू होतो. हेपटायटीसचे चार प्रकार आहेत, हेपटायटीस-ए, हेपटायटीस बी, हेपटायटीस सी, हेपटायटीस ई हे त्याचे सर्वसाधारण प्रकार आहेत. हिपेटायटिस ए आणि हिपेटायटिस ई व्हायरस – हे व्हायरस दूषित पाणी किंवा दूषित अन्नातून आपल्या पोटात जातात. ते यकृतावर हल्ला करतात आणि आपण जी कावीळ म्हणतो ती याचमुळे होते. यामध्ये रुग्णाला थकवा आणि ताप येतो. डोळे पिवळे होतात आणि लघवी पिवळसर लाल होते. यकृताला सूज येते. काविळचे निदान लवकरात लवकर होणं आवश्यक असतं. मुंबई- नवी मुंबई ठाणे इथे 'ए' आणि 'ई' प्रकारच्या काविळीच्या रुग्णांची संख्या जास्त आहे. या काविळीच्या व्हायरसचा दूषित पाण्यातून प्रसार होतो, असे गेल्या १० वर्षांच्या निरीक्षणांमधून सिद्ध झाले आहे".

जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणानुसार, आतापर्यंत जगातील २ अब्ज लोक काविळीने बाधित झाले आहेत. जगातली प्रत्येक पंधरावी व्यक्ती या विषाणूने बाधित होत असते. जगभरात दरवर्षी ७ लाख लोक या रोगाच्या गंभीर दुष्परिणामामुळे मृत्युमुखी पडतात. हेपेटायटिसच्या बाबतीत जागतिक क्रमवारीत भारत देश पहिल्या १० मध्ये येत असून लोकसंख्येच्या ४ ते ८ टक्के लोक दरवर्षी या विषाणूने बाधित होतात.

**-उमेश भोगले**

# महिला कॉन्स्टेबलची गळफास घेऊन आत्महत्या

## सुसाईड नोटमुळे कोल्हापुरात खळबळ

**कोल्हापुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका महिलेने टोकाचं पाऊल उचलंत आपल्या आयुष्याचा शेवट केला आहे.**

कोल्हापूर, कोल्हापुरातील एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने गळफास घेत आपल्या आयुष्याचा शेवट केला आहे. या घटनेने कोल्हापुरात एकच खळबळ उडाली आहे. कसबा बावडा येथे आपल्या राहत्या घरात योगिनी पवार यांनी गळफास घेत आपल्या आयुष्याचा शेवट केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, योगिनी पवार या कोल्हापूर पोलीस मुख्यालयात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत होत्या. प्राथमिक माहितीनुसार, योगिनी सुकुमार पवार या कसबा बावडा येथे असलेल्या पोलीस लाईनमध्ये वास्तव्यास होत्या. आपल्या कुटुंबासोबत त्या तेथे राहत होत्या. कौटुंबिक वादातून आणि पतीकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून त्यांनी आत्महत्येचं पाऊल उचललं आहे. या घटनेची माहिती मिळातच पोलिसांची टीम घटनास्थळी दाखल झाली.




### सुसाईड नोटमध्ये काय?

मिळालेल्या माहितीनुसार, आत्महत्या करण्यापूर्वी योगिनी पवार यांनी एक सुसाईड नोट लिहिली होती. ही चिठ्ठी त्यांच्या घरात आढळून आली आहे. आपल्या पतीकडून होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक त्रासाला कंटाळून आपण आत्महत्या करत असल्याचं त्यांनी या चिठ्ठीत लिहिलं आहे. या सुसाईड नोटच्या आधारे पोलिसांनी योगिनी पवार यांच्या पतीला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

### पुण्यात वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यानं संपवलं जीवन

काही दिवसांपूर्वी पुण्यात भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल पदावर कार्यरत असणाऱ्या एका महिला अधिकाऱ्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली होती. ही खळबळजनक घटना ताजी असताना, डिसेंबर महिन्यात पुण्यातील आणखी एका वरिष्ठ पदावरील माहिला पोलीस अधिकाऱ्याने आत्महत्या केली.

संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्याने आपल्या राहत्या घरात ओढणीनं गळफास घेत आयुष्याचा शेवट केला आहे. दुपारी दीडच्या सुमारास ही घटना उघडकीस येताच पोलीस प्रशासनाला धक्का बसला आहे. या घटनेची माहिती मिळताच वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

# मुंबईतून गावी परतल्यानंतर तरुणाने बायको-मुलांची केली हत्या; घर उघडलं तर पोलिसही हादरले!



जयपूर,राजस्थानमधील सीकरमध्ये एका तरुणाने आपली पत्नी आणि मुलाची हत्या करून जीव घेतला. घरात महिला आणि मुलाचा मृतदेह पलंगावर पडलेला होता. तर पती त्याच खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत होता. लोकांनी सांगितलं की, तीन मृतांना शुक्रवारी सायंकाळनंतर घरातून बाहेर पडले नव्हते. शनिवारी सायंकाळी गावकऱ्यांनी पोलिसांना याबाबत सूचना मिळाली. पोलीस पोहोचले तेव्हा तिघांचा मृतदेह पडले होते.

ही घटना गणेश्वर भागातील आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री साधारण 10 वाजता काही लोकांनी याबाबत सूचना दिली होती. घटनास्थळी पाहिलं तर संपत कुमावतचा (28) मृतदेह खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत होता. तर पत्नी पूजा (24) आणि मुलगा चीनू (2) यांचे मृतदेह पलंगावर पडले होते. प्राथमिक तपासानुसार, पतीने पहिल्यांदा आपली पत्नी आणि मुलाची हत्या केली. यानंतर गळफास घेऊन आत्महत्या केली.

### महिलेच्या शरीरावर जळाल्याच्या खुणा..

महिलेच्या शरीरावर अनेक ठिकाणी जळाल्याच्या खुणा दिसल्या आहेत. मृत संपतचा लहान भाऊ काही कारणासाठी आत्याच्या घरी गेला होता. अशावेळी घरात केवळ तिघेच होते. आजूबाजूच्या लोकांचं म्हणणं आहे की, शुक्रवारी दुपारनंतर तिघांपैकी कोणीच घराबाहेर आले नव्हते. शनिवारी कोणी सदस्य दूध घेण्यासाठी घराबाहेर पडला नाही. याशिवाय घराला टाळंही नव्हतं. मृत संपत कुमावत आपल्या कुटुंबासह मुंबईत टाइल्स लावण्याचं काम करीत होता.

# तरुणाला एकटं घेरलं, लोखंडी रॉड-तलवारीने वार, भंडाऱ्यात तरुणाची निर्घृण हत्या

भंडारा, : एखाद्या व्यक्तीसोबत खटकलं की त्याचा राग मनात धरुण त्याला इजा पोहोचवण्याचा विचार मनात येईपर्यंत द्वेष निर्माण होणं हे खरंच आपल्या स्वत:साठी धोकादायक आहे. खरंतर याच द्वेषामुळे अनेकांचं नुकसान झालं. त्यामुळे द्वेषावर संयम हा रामबाण उपाय आहे.

संयम सहज मिळत नाही. तो मिळवावा लागतो. त्यासाठी खूप परिश्रम आणि यातना सोसाव्या लागतात. मनाची तयारी करावी लागते. पण तो संयम मिळवला तर जगणं खूप सोपं होतं. हे सगळं सांगण्यामागचं कारण म्हणजे भंडाऱ्यात झालेली भयानक घटना. भंडाऱ्यात तरुणांचा संयम सुटला. त्यांनी समोरच्या व्यक्तीचा इतका द्वेष मनात ठेवला की त्याचा जीव जाईपर्यंत निर्घृणपणे त्याला मारहाण केली. या मारहाणीचा जो सूत्रधार होता त्याला हत्येनंतर आपण चुकीचं केलंय असा साक्षात्कार झाला आणि तो स्वत:हून पोलिसांच्या स्वाधिन झाला. पण




या घटनेमुळे आपली वाटचाल नेमकी कोणत्या दिशेला चालली आहे? असा प्रश्न निर्माण होतो. भंडाऱ्यात घडलेल्या तरुणाच्या खूनेच्या घटनेवर अनेकांकडून दु:ख व्यक्त केलं जात आहे. संबंधित घटनेमुळे संपूर्ण जिल्हा हादरला आहे. एका तरुणाची पूर्व वैमनस्यातून त्याच्याच बरोबरीच्या तरुणांकडून निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. या हत्येच्या घटनेमुळे संबंधित परिसरात दहशतीचं वातावरण आहे. या घटनेतील मृतक तरुणाचं सम्येक मेश्राम असं नाव आहे. तो 35 वर्षांचा होता. तर त्याला जीव जायीपर्यंत तलवार, रॉडच्या साहाय्याने मारहाण करणाऱ्या 30 वर्षीय आरोपीचं सचिन ऊके असं नाव आहे. आरोपी सचिनने आपल्या इतर मित्रांच्या मदतीने सम्येकची हत्या केली. संबंधित घटना ही कारधा पोलीस ठाणे हद्दीतील आमगाव येथे घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृतक सम्येक याचा आरोपी सचिनशी जुन्या एका विषयामुळे वाद सुरु होता. त्यांच्यातील वाद विकोपाला जाऊन सचिनने सम्येक मेश्रामला संपवण्याचं ठरवलं. त्यातून संध्याकाळी सम्येक मेश्रामला एकटे बघून आरोपी सचिन ऊके आणि त्याच्या मित्रांनी गुप्ती, तलवार आणि रॉडच्या सहाय्याने त्याच्यावर वार केले. यात सम्येक रक्ताचा थारोळ्यात पडून जागीच गतप्राण झाला.

# पुण्यातील कागत्र भागात भिंतीवर डोके आपटून तीन वर्षांच्या बालिकेचा खून, सावत्र वडील अटकेत

पुण्यात सावत्र वडिलांनी तीन वर्षांच्या बालिकेचे डोके भिंतीवर आपटून तिचा खून केल्याची घटना कात्रजमधील आंबेगाव बुद्रुक भागात घडली. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी सावत्र वडिलांना अटक केली. मुस्कान पाटील (वय ३) असे खून झालेल्या बालिकेचे नाव आहे.




या प्रकरणी आरोपी जितेंद्र उत्तम पाटील (वय ३३, रा. श्रीकृष्ण अपार्टमेंट, आंबेगाव बुद्रुक, कात्रज) याला अटक करण्यात आली. याबाबत एका महिलेने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिलेचा घटस्फोट झाला आहे. महिलेचा चार महिन्यांपूर्वी जितेंद्रशी विवाह झाला. तिला तीन वर्षांची मुलगी आहे. या मुलीचा जन्म अनैतिक संबंधातून झाल्याचे म्हणत आरोपी जितेंद्रने पीडित मुलगी मुस्कानला मारहाण केली. तसेच तिचे डोके भिंतीवर आपटले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्क:-9594418181 / 8424989898